जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ Email ID :dokh.rfd@maharashtra.gov.in

---

क्रमांक: गौखनि-३४/०९२४/प्र.क्र.१०३/खनिज-१ **दिनांक:- १० ऑगस्ट,२०२६**

विषय:- गौण खनिज- पुणे
सन २०१४-१५ कालावधीतील पुणे जिल्ह्यातील मौजे निमगाव सावा/जाधववाडी भूखंड क्रमांक ६ या वाळू गटाची शासन जमा केलेली १/४ रक्कम परत मिळणेबाबत.
श्री. अजय राजेंद्र पवार

शासन ज्ञापन :-

सन २०१४-१५ या **कालावधीतील** मौजे निमगांव सावा / जाधववाडी भूखंड क्र.६, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे हा वाळू गट लिलावधारक श्री. अजय राजेंद्र पवार र.रु.७५,३३,४४०/- सर्वोच्च बोलीने मंजूर करण्यात आला होता. लिलावधारक यांनी लिलावाची १/४ रक्कम रुपये १८,८३,३६०/- शासन जमा केली आहे.

०२. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.८६१/२०१५ मध्ये पारीत आदेशाच्या अनुषंगाने प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच, लिलावाची उर्वरित ३/४ रक्कम भरुन घेण्याबाबत लिलावधारक यांनी विनंती केली होती, तथापि प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने लिलावधारक यांच्याकडून उर्वरित रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयाने भरुन घेतली नाही. तसेच, वाळू गटाचा ताबा लिलावधारक यांना दिलेला नाही. सदर बाब पहाता लिलावधारक श्री. अजय राजेंद्र पवार यांनी शासन जमा केलेली लिलावाची १/४ **रक्कम** रुपये १८,८३,३६०/- (रुपये अठरा लाख त्र्याऐंशी हजार तीनशे साठ फक्त) अदा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

०३. सबब, लिलावधारक श्री. अजय राजेंद्र पवार यांनी लिलावाची १/४ रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापुर्वी ही रक्कम अदा केलेली नाही, याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर लिलावाची १/४ **रक्कम** रुपये १८,८३,३६०/- (रुपये अठरा लाख त्र्याऐंशी हजार तीनशे साठ फक्त) इतकी **लिलावधारक श्री. अजय राजेंद्र पवार यांना** अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. **तथापि, सदर रकमेवर व्याज अनुज्ञेय राहणार नाही.**

०४. या बाबीवर होणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता "०८५३-अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग" १०२- खनिजाबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग-वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

०५. सदर शासन ज्ञापन, वित्त विभागाच्या क्र.विअप्र-२०१९/प्र.क्र.२०/२०१९/विनियम, दि.८/८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग-२ नुसार महसूल व वन विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक **२०२६०८१०१८१७४५५५४८** असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RATHOD UMESH DHARMA

Digitally signed by RATHOD UMESH DHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=FA30EEF6A9E239E9B4F8129A1B10556B20319BBEC898D94F4E0E028A365FCEC5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3667A98F6D3E5F0ED5652697D674C2EB05D852DD34F87FDA6A20696C80787981, cn=RATHOD UMESH DHARMA
Date: 2026.08.10 18:18:44 +05'30'

(डॉ. उमेश ध. राठोड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

जिल्हाधिकारी, पुणे

प्रत:-

१. विभागीय आयुक्त, पुणे.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०.
३. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
५. वित्त विभाग (व्यय-९/अर्थसंकल्प-३/६/१४ कार्यासने) मंत्रालय, मुंबई-४०००३२
६. कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१),
७. निवडनस्ती